# जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी, ठाणे यांचे कार्यालय.

पत्ता:- १. जिल्हा निवडणूक शाखा, तळमजला, जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे. प. ४०० ६०१

दुरध्वनी क्रमांक ०२२ - २५४५४१४२, फॅक्स नंबर ०२२ - २५३४२१२५

Website - www.thaneelection. com


**निवडणूक तात्काळ**

क्र.सामान्य/कक्ष-१/मेज-४/निवडणूक/पदवीधर/कावि-३५९/२०२३

दिनांक:-२०/१०/२०२३

निवडणूक विभाग
आ.क्र. 928
दिनांक 23/10/2023

प्रति,

१. मा. आयुक्त, ठाणे /कल्याण- डोंबिवली / भिवंडी - निजामपूर/ उल्हासनगर / मिरा-भाईंदर महानगरपालिका **सर्व**
२. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे.
३. मुख्याधिकारी, कुळगाव – बदलापूर / अंबरनाथ नगरपरिषद
४. मुख्याधिकारी, मुरबाड / शहापूर नगरपंचायत
५. उपविभागीय अधिकारी, ठाणे / कल्याण / भिवंडी / उल्हासनगर
६. तहसिलदार, ठाणे/भिवंडी/ कल्याण/ उल्हासनगर/ अंबरनाथ/ शहापूर/ मुरबाड
७. अपर तहसिलदार मिरा भाईंदर
८. गटविकास अधिकारी, मुरबाड/ शहापूर/ भिवंडी/ कल्याण पंचायत समिती

विषय :- दिनांक १ नोव्हेंबर, २०२३ अर्हता दिनांकावर आधारित कोकण विभाग पदवीधर मतदारसंघाच्या मतदार याद्या करणेबाबतचा कार्यक्रम. मतदार नोंदणी अधिनियम १९६० चे कलम ३१ (४) अन्वये जाहीर सूचना पुर्नप्रसिध्दी करणेबाबत

संदर्भ :- मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचेकडिल पत्र क्र. साशा/कार्या-७/रकाप/निवडणूक/ कार्यक्रम/२०२३ दि. १९/१०/२०२३.

उपरोक्त विषयाचे संदर्भिय पत्रान्वये दिलेल्या निर्देशानुसार मा. भारत निवडणूक आयोगाकडून कोकण विभाग पदवीधर मतदार संघासाठी नव्याने मतदार याद्या (de-novo) तयार करण्यासाठी कार्यक्रम जाहीर झालेला असून सदर कार्यक्रमाची मतदार नोंदणी नियम, १९६० मधील कलम ३१(४) नुसार दिनांक १६ ऑक्टोंबर,२०२३ रोजी पुर्नप्रसिध्दी करण्यात आलेली असून, दिनांक २५ **ऑक्टोंबर,२०२३** रोजी सर्व उपविभागीय अधिकारी कार्यालय, तहसिल कार्यालय, जिल्हा परिषद, पंचायत समिती, कार्यालय तसेच पदनिर्देशित ठिकाणे येथे व्दितीय पुर्नप्रसिध्दीची करावयाच्या जाहीर सूचनेची प्रत या सोबत जोडून आपणाकडे पाठवित आहोत.

सबब सदर जाहीर सूचना दिनांक **२५ ऑक्टोंबर,२०२३** रोजी उक्त नमूद केलेप्रमाणे आपले कार्यालयाचे व अधिनस्त कार्यालयाचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात यावी व प्रसिध्दी अहवाल या कार्यालयास सादर करावा.

AVkadam

(अर्चना कदम)

उपजिल्हा निवडणूक अधिकारी, ठाणे

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे कार्यालय
कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४००६१४
सामान्य प्रशासन शाखा
दूरध्वनी क्र : ०२२-२७५७१५०१ Email ID : gbkonkan@gmail.com

क्र.साशा/कार्या-७/रकाप/निवडणूक/कार्यक्रम/२०२३ दि. १९/१०/२०२३

निवडणूक **तात्काळ**

प्रति,
जिल्हाधिकारी तथा सहा. मतदार नोंदणी अधिकारी
ठाणे

विषय :- दिनांक १ नोव्हेंबर, २०२३ या अर्हता दिनांकावर आधारीत कोकण विभाग पदवीधर मतदारसंघाच्या मतदार याद्या करणेबाबतचा कार्यक्रम.

संदर्भ :- १. सचिव, मा.भारत निवडणूक आयोगाचे No.३७/LC/२०२३-ERS(Vol-III), दि.९ ऑगस्ट, २०२३.
२. उप सचिव व सह मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचेकडील पत्र क्र.ईएलआर-२०२३/प्र.क्र./५६८/का-३३, दि.२१.०८.२०२३.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कोकण विभाग पदवीधर मतदार संघाच्या मतदार याद्या तयार करणेबाबत संदर्भिय पत्र क्र.१ व २ नुसार घोषित करण्यात आलेल्या कार्यक्रमांतर्गत मतदार नोंदणी नियम १९६० चे नियम ३१ (३) अन्वये जाहीर सूचना दिनांक ३० सप्टेंबर २०२३ रोजी प्रसिध्द करणेत आलेली आहे. तसेच मतदार नोंदणी नियम १९६० चे नियम ३१ (४) अन्वये नोटीसीची प्रथम पुर्नप्रसिध्दी दिनांक १६/१०/२०२३ रोजी करण्यात आलेली असून, दि. २५/१०/२०२३ रोजी नोटीसीची द्वितीय पुर्नप्रसिध्दी करणेबाबतचे निर्देश आहेत त्यानुसार आपले जिल्ह्यातील दोन वर्तमानपत्रांत तसेच जिल्हाधिकारी कार्यालय, आपले जिल्ह्यातील उपविभागीय अधिकारी कार्यालये, तहसिल कार्यालये, जिल्हा परिषद, पंचायत समिती कार्यालये व इतर पदनिर्देशित अधिकारी यांची कार्यालये येथे सदर नोटीसीची द्वितीय पुर्नप्रसिध्दी करण्यात यावी व त्याबाबतचा प्रसिध्दी अहवाल दि. २५/१०/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत या कार्यालयास सादर करणेत यावा.

(डॉ. महेंद्र कल्याणकर)
मतदार नोंदणी अधिकारी तथा
विभागीय आयुक्त कोकण विभाग

**प्रत**- उपजिल्हा निवडणूक अधिकारी ठाणे यांना आवश्यक व उचित कार्यवाहीस्तव

## भारत निवडणूक आयोग

### महाराष्ट्र विधान परिषदेच्या कोकण विभाग पदवीधर मतदार संघाची मतदार यादी तयार करणे

### मतदार नोंदणी नियम, १९६० चा नियम ३१ (४) प्रमाणे नोटीस

मतदार नोंदणी नियम, १९६० च्या नियम ३१ (३) नुसार मतदार नोंदणी अधिकारी कोकण विभाग पदवीधर मतदार संघ, यांनी त्यांच्या दिनांक ३० सप्टेंबर २०२३ च्या नोटीस नुसार वर उल्लेखित पदवीधर मतदार संघाचे यादीत नाव नोंदणी करण्यासाठी पात्र असलेल्या प्रत्येक व्यक्तीस असे आवाहन करतात की, मतदार नोंदणी नियम, १९६० मध्ये जोडलेला आणि दिनांक ३० सप्टेंबर २०२३ रोजी १. बहुजन रत्न आणि २. न्युज बँड या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या नोटीस मधील परिशिष्ट दोन मध्ये दिलेला नमुना १८ मधील अर्ज दिनांक ०६ नोव्हेंबर २०२३ रोजी वा त्यापुर्वी कार्यालयान वेळेत त्यांचे कार्यालयात या मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी त्याने/तिने पाठवावा किंवा पोहचवावा.

वर उल्लेखित व्यक्तींनी, त्यांनी जर अद्याप त्यांची नावे मतदार यादीत नोंदविलेली नसतील तर त्यांनी नमुना १८ मधील त्यांचे अर्ज दिनांक ०६ नोव्हेंबर २०२३ रोजी अथवा त्यापुर्वी कार्यालयीन वेळेत सादर करावेत.

या संदर्भात सर्व माहिती मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र यांच्या www.ceo.maharashtra.gov.in या वेबसाईटवर सुध्दा उपलब्ध आहे.

सही/-
( डॉ. महेंद्र कल्याणकर)
मतदार नोंदणी अधिकारी तथा
विभागीय आयुक्त कोकण विभाग

ठिकाण :- नवी मुंबई
दिनांक :- २५/१०/२०२३

# ELECTION COMMISSION OF INDIA

## Revision of Electoral Rolls for Konkan Division Graduates 'Constituency of Maharashtra Legislative Council

### Notice under rule 31 (4) of the Registration of Electors Rules, 1960

In pursuance of rule 31 (3) of the Registration of Electors Rules, 1960, the Electoral Registration Officer of Konkan Division Graduates' Constituency vide his notice dated 30th September 2023 called upon every person entitled to be registered in the electoral roll of the relevant Graduates' Constituency mentioned above, to send to, or deliver at, his Office, on or before 6th November 2023. An application in Form 18 appended to the Registration of Electors Rules, 1960 and reproduced in the second schedule of the said notice published in the edition dated 30th September 2023 of (1) Bahujan Ratn And (2) News Band Newspapers.

All the above mentioned persons may submit their applications in Form 18 on or before 6th November 2023, if not already done.

The said details are also available in the official website of the Chief Electoral Officer, Maharashtra at www.ceo.maharashtra.gov.in

sd/-
( Dr.Mahendra Kalyankar )
Electoral Registration Officer and
Divisional Commissioner, Konkan Division

Place :- Navi Mumbai
Date :- 25/10/2023